—: प्रेसनोट :—

अ.पं.वि. कक्ष, बांद्रा युनिट, गु.शा., गु.अ.वि., मुंबई, दिनांक :— १७/११/२०२१

अंमली पदार्थ विरोधी कक्ष, बांद्रा युनिट, मुंबई यांचेकडुन मु. पो. ढोलगरवाडी, ता. चंदगड, जिल्हा कोल्हापूर येथे छापा टाकुन मेफेड्रॉन (एम.डी.) या अंमली पदार्थ बनविण्याची कारखाना उघडकीस आणले बाबत.

| | |
|---|---|
| कक्ष | अंमली पदार्थ विरोधी कक्ष, बांद्रा युनिट, गु.शा., गु.अ.वि., मुंबई. |
| गु.र.क्र. व कलम | ९६/२०२१, कलम ८ (क) सह २२(क), २५,२७(अ),२९ एन.डी.पी.एस. कायदा १९८५ |
| गुन्हा दाखल दिनांक | दिनांक १३/११/२०२१ रोजी ११.३५ वा. |
| गुन्हा घडला दिनांक व वेळ | दिनांक १३/११/२०२१ रोजी ०७.३० वा. ते ०९.०५ च्या सुमारास |
| घटनास्थळ | खैराणी रोड, साकीनाका, मुंबई. |
| अटक आरोपीची संख्या | ०२ |
| जप्त मुद्देमाल व अंदाजे किंमत | जप्त मुद्देमाल:— <br> आरोपी क्र. ०१ कडुन ५० ग्रॅम मेफेड्रॉन (एमडी) हा अंमली पदार्थ (अं.किं.रु ५,००,०००/—) <br> २) एकुण — १२० ग्रॅम मेफेड्रॉन (एमडी) हा अंमली पदार्थ. (अं.किं.रु १२,००,०००/—) <br> ३) ३८ किलो ७०० ग्रॅम वजनाचा मेफेड्रॉन' (एम.डी) हा अंमली पदार्थ बनविण्याचा कच्चा माल. (अं.किं.रु १९,३५,००,०००/—) <br> ४) इतर रासायनिक द्रव पदार्थ व अंमली पदार्थ तयार करण्याची मशिनरी, (अं.किं.रु २५,००,०००/—) <br> ( एकुण—०२ कोटी ३५ लाख ५० हजार रूपये /— रू किंमतीचा मुद्देमाल ) |

थोडक्यात हकिकत:—

मुंबई शहारात अंमली पदार्थाची खरेदी विक्री करणारे, पुरवठा करणारे, साठा करणारे इसमांचा शोध घेवुन त्यांचे विरूध्द कडक कारवाई करण्याबाबत मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी आदेश दिलेले आहेत. त्यानुसार अंमली पदार्थ विरोधी कक्ष, बांद्रा युनिट, गुन्हे शाखा, मुंबई चे पथक वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे अंमली पदार्थाची खरेदी विक्री करणारे, पुरवठा करणारे, साठा करणारे इसमांचा सातत्याने शोध घेवुन त्यांचेवर कारवाई करण्यात येत असते.

दिनांक १२/११/२०२१ रोजी प्राप्त गोपनिय माहीतीस अनुसरून दि. १३/११/२०२१ रोजी दोन पंचासह प्राप्त खबरीतील घटनास्थळी रवाना होवून पंचासह सापळा रचण्यात आला असता सदर ठिकाणी खबरीमधील वर्णनाप्रमाणे एक महिला मिळुन आली. त्यानंतर नमुद महीलेची पंचासमक्ष झडती घेतली असता तीचे कब्जात ५० ग्रॅम मेफेड्रॉन (एमडी) हा अंमली पदार्थ मिळुन आला.

नमुद महीलेकडे विचारपुस केली असता तिच्याकडे मिळुन आलेला अंमली पदार्थ तिला एका व्यक्तीने दिला असल्याचे सांगुन त्याचा मु. पो. ढोलगरवाडी, ता. चंदगड, जिल्हा कोल्हापूर येथील फॉर्म हाऊसवर मेफेड्रॉन (एम.डी) हा अंमली पदार्थ बनविण्याचा कारखाना असल्याबाबत माहीती दिली. सदर माहीतीच्या अनुषंगाने मा.वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली विशेष तपास पथक पो.नि.सुतार, पो.नि.दहिफळे, सहा. तपासी अधिकारी सपोनि वाहीद पठाण, पोउनि पवळे व पोलीस अंमलदारांचे पथकाने फार्महाउस पटकी, मु. पो. ढोलगरवाडी, ता.चंदगड, जि.कोल्हापुर येथे स्थानिक चंदगड पोलीस ठाण्याची मदतीने छापा टाकला असता त्या ठिकाणी निखील रामचंद्र लोहार, वय–२९ वर्षे, धंदा–नोकरी, रा.ठि. मारूती गल्ली, मु. पो. ढोलकरवाडी, ता. चंदगड, जिल्हा कोल्हापूर हा इसम मिळुन आला. त्याचेकडे अधिक तपास केला असता तो नमूद ठिकाणी राजकुमार राजहंस यांचे फार्म हाउसचे देखरेख व पाहणी करण्याचे काम करत असल्याचे सांगितले.

सदर फार्महाऊसची प्रादेशिक न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, कोल्हापुर येथील रासायनिक विश्लेषक व पथक यांचे मदतीने तपासणी केली केली असता त्या ठिकाणी मेफेड्रॉन' (एम.डी.) हा अंमली पदार्थ बनविण्याकरीता वापरात येणारी रसायने, काचेची उपकरणे, तसेच १२२ ग्रॅम'मेफेड्रॉन' (एम.डी.) हा अंमली पदार्थ व ३७ किलो ७०० ग्रॅम वजनाचा मेफेड्रॉन' (एम.डी.) हा अंमली पदार्थ बनविण्याचा कच्चा माल घटनास्थळी मिळून आला.

सदर फार्म हाऊसचा मालक हा मागिल काही कालावधीपासुन सदरच्या फार्म हाऊसमध्ये कोणालाही शंका येवुन नये म्हणुन पोल्ट्री फार्म व गोटफार्म चालवत असल्याचे भासवुन त्याठिकाणी मेफेड्रॉन (एमडी) हा अंमली पदार्थ बनविण्याचा कारखाना चालवत असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे.

सदर फार्महाऊसची देखरेख करणारा इमस निखील रामचंद्र लोहार वय २९ वर्ष याचेकडे केलेल्या चौकशीत तो सदरच्या फार्म हाऊसचा मालक राजकुमार अर्जुनराव राजहंस याचे सोबत मेफेड्रॉन (एमडी) हा अंमली पदार्थ बनविण्याचे काम करत असल्याचे निष्पन्न झाल्याने त्याचा गुन्हयात सहभाग असल्याचे स्पष्ठ झाले. म्हणुन त्यास दि. १६/११/२०२१ रोजी नमुद गुन्हयात अटक करण्यात आली आहे. तरी सदर फार्म हाऊसचा मालक श्री. राजकुमार अर्जुनराव राजहंस याचा शोध घेण्यात येत आहे.

राजकुमार अर्जुनराव राजहंस हा सदरच्या कारखान्यात तयार करण्यात येत असलेला मेफेड्रॉन (एमडी) हा अंमली पदार्थ मुंबई शहर तसेच मुंबई उपनगर येथे येवुन ड्रग पेडलरना सदरचा अंमली पदार्थ विकत असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. तसेच तो इतर ठिकाणीही सदरचा अंमली पदार्थ विक्री करत असण्याची शक्यता आहे. तसेच त्याचा आंतरराज्यीय अंमली पदार्थ तस्करीमध्ये ही सहभाग असण्याची शक्यता आहे. त्या दृष्टीने पुढील तपास सुरू आहे.

सदर कारवाई मा.पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. मिलिंद भारंबे सो, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. विरेश प्रभु सो, मा. पोलीस उप आयुक्त श्री. दत्ता नलावडे सो, पो.नि.काळे (स.पो.आ.अति. कार्य) अंमली पदार्थ विरोधी कक्ष यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्ष, बांद्रा युनिटचे प्र.पो.नि. संजय चव्हाण यांचे नेतृत्वाखाली म.पो.नि.लता सुतार, पो.नि.दहीफळे, सपोनि वाहीद पठाण, सपोनि सिध्दराम म्हेत्रे, सपोनि फरिद खान, सपोनि सुरेश भोये, पोउनि पवळे, पोउनि पाटील, पो.ह.क्र. ३३४५५/देसाई, पो.ह. चा.९९०६३०/बडे, म.पो.ना. ००४२५/आव्हाड, पो.ना.क्र.०४–०८४८/मांढरे, पोना क्र. ०७०१६९/राणे, पोना क्र. ०३०२६६/कानडे, पोना क्र. ०५०२११/चव्हाण, पो.शि.क्र.०८१०५६/राठोड, पो.शि.क्र. ००३०४/सौदाणे, पो.शि.क्र.०९०३४२/केंद्रे, पो.ना.चा.क्र.०७०१६९/ राणे, पो.ना.चा.क्र.९७०८७४/पवार, पो. शि.क्र. ०९०२७६/काळे, पो.शि.क्र.०८७१२/भुजबळ, मपोना ०९२५७१/पवार यांनी पार पाडली असुन गुन्हयाचा पुढील तपास मा. वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली अं.प.वि.कक्ष, बांद्रा युनिटचे स.पो.नि सुरेश भोये, हे करीत आहेत.